# गतकाळ ते वर्तमानकाळ असा ग्रामसंस्कृतीचा पट मांडणारी कलाकृती (पुस्तक समीक्षा)

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर**

**प्राध्यापक, मराठी विभाग**

**विवेकानंद कॉलेज ,कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

मराठी साहित्यातील प्रसिद्ध साहित्यिक आणि कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांचा 'चांदवाडी रुपाया' हा संस्कृती प्रकाशन,पुणे यांनी प्रकाशित केलेला ललित लेखसंग्रह असून त्यामध्ये एकूण बारा लेख आहेत. आप्पासाहेब खोत यांनी आपल्या लेखन साहित्यातून ग्रामीण जीवनातील शेती,समाज,निसर्ग,स्त्री,सण,संस्कृती यावर भाष्य केले आहे.शेती, जमीन झाड यांच्या पार्श्वभूमीवर व्यक्ती, कुटुंब, नाती, स्त्रीविश्व याविषयीची मांडणी करताना संस्कृती, परंपरा सांभाळत आप्पासाहेब खोत यांनी कृतार्थता भाव जपला आहे.ललितगद्य या साहित्यप्रकारातून सुद्धा आप्पासाहेब खोत यांच्या कथात्म शैलीचा विशेष प्रभाव जाणवतो.

या लेखसंग्रहातील बारा लेखांच्या माध्यमातून आप्पासाहेब खोत यांनी कृषी परंपरा, शेती ,झाड ,जनावर याबद्दलचा जिव्हाळा कृतज्ञता आणि कृतार्थतेची भावना नात्यातील भावनिक बंध, श्रद्धाळू मन अशा आशयसूत्रांना समोर ठेवून लेखन केले आहे.

‘चांदवडी रुपया' या शीर्षक लेखातून खेड्यापाड्यातील शेतकरी बांधव सावकारी कर्जामध्ये अडकल्याने त्यांची कोंडी कशी होते याबद्दल सांगताना ग्राम संस्कृतीमध्ये माणुसकी कशी जिवंत आहे याबद्दलही सांगितले आहे. सावकाराला महाभयंकर सैतान असे लेखकाने विशेषण वापरले आहे. रोगराई , दुष्काळ अशा संकटांमध्ये शेतकरी कुटुंबाला कर्ज घेण्यावाचून पर्याय नसतो. निवेदकाला खाडे या सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. शेतकऱ्याच्या आगतिकतेतून सावकाराकडून मुदत वाढवून घ्यावी लागली. कष्ट, काटकसर, बचत करून सावकाराचे कर्ज भागवताना एक चांदवडी रुपया कमी पडला. त्यावेळी गावातील शेतकऱ्याचा मित्र लखुपंत यांनी आपल्या जवळचा चांदवडी रुपया दिला. सावकाराचे कर्ज फिटले पण सावकाराने जमिनीची कागदपत्रे परत दिली नाहीत. पुढची मुदत देत राहिला पण शेतकऱ्याने ही साम- दाम -दंड ह्या मार्गाने सावकाराकडून कागदपत्रे परत घेतली. ज्या लखुपंत कुलकर्णी यांनी चांदवडी रुपया देऊन त्या शेतक-यावर उपकार केले त्याला त्यांनी गांधी हत्येनंतरच्या दंगलीपासून वाचवले. कर्ज फेडण्यासाठी लखुपंत कुलकर्णी उपयोगी पडले पण त्याच्या उपकाराची परतफेड त्या शेतकऱ्याने त्यांच्या जीवित व वित्तहानी होण्यातून वाचवले. थोडक्यात, 'चांदवडी रुपाया' या लेखातून खेड्यातील कर्जबाजारीपणा, शेतकऱ्याची निकड, सावकाराकडून होणारी फसवणूक, दहशत, उपकाराची परतफेड उपकारणे करणे, काट्याने काटा काढण्याची वृत्ती इत्यादी बाबी या लेखातून मांडल्याआहेत.

‘ओंजळीतील दान' या लेखातून लेखकाने आई-वडील, चुलताचुलती, आजी या नात्यातील माणसानी मुलाबाळांचे आयुष्य सुखी व्हावे म्हणून आयुष्यभर पुरून उरेल एवढे स्वतःकडील ओंजळीतील दान दिलेले असते याविषयी सांगितले आहे . ते दान जमीन, जुमला, संपत्ती, सोने नाणे या स्वरूपाचे असत. तसेच ते आशीर्वादरुपी दानही असते. तेवढ्या दानात त्या मुलाबाळांचे आयुष्य सुखी समाधानी करण्याचे सामर्थ्य असते.या लेखातून लेखक परंपरावादी असल्याचे जाणवते. निवेदकाच्या आईला सासूकडून प्रेम मिळत असते. सासूसुनेच नातं प्रेमळ, समंजस असते. थोरल्या जावेबरोबरच्या संघर्षामुळे स्त्रियांच्या कोडमाऱ्याचेही वर्णन यात येते. अशा स्त्रियांची वेदना, त्यांचे दुःख याची जाणीव करून देणारा हा लेख आहे. लहानपणापासून आईचे कष्ट पाहणाऱ्या या निवेदकाने नोकरी लागल्यानंतर आईला दागिने करून घातले. ही कृतार्थतेची भावना ध्यानात घेता येईल.

'सासू सुनेचं नातं' या लेखातून सासू सूनेच्या नात्याच्या निमित्ताने बदलत्या खेड्याचे वास्तव स्त्रीचं जगणं मांडले आहे.खेड्यातील संस्कृती,तिथलं जगणं,स्त्रीचे सुखदुःख या सर्व गोष्टी खेड्यातील स्त्रियांच्या निवांतपणाच्या गप्पा,शेतात काम करत असतानाच्या गप्पा यातून ध्यानात येतात. स्त्रियांच्या गप्पातून घर, प्रपंच, पैपावण, सासुरवास, रूढी, परंपरा, म्हातारपणाची ससेहोलपट या गोष्टी ललित लेखातून समोर येतात.

सासूसूनेच नातं एकमेकांना समजून घेण्यातून, मदत करण्यातून ,चुका माफ करण्यातून ,कौतुक करण्यातून समजून येते. स्त्रीच्या जबाबदारी घेण्यातून त्या

घराचे घरपण टिकते. सून घराला जीव लावणारी हवी. घराचं भवितव्य आरोग्यपूर्ण स्त्रीवर अवलंबून असते. म्हणून निवेदकाची आई आपल्या सुनेला म्हणते,“तू सांभाळून –हा मजी झालं.“ (पृष्ठ ४७) आधुनिक काळातील सूनेबद्दलची मते लेखकाने मांडली आहेत.आत्ताच्या परिस्थितीत सून म्हणून परक्या घरात येणाऱ्या मुलींच्याकडे शिक्षण आहे पण संस्कार नाहीत असे लेखकाने सूचित केले आहे. थोडक्यात,सासू सुनेच्या नात्याच्या निमित्ताने आप्पासाहेब खोत यांनी बदलत्या खेड्याचही चित्रण केले

आहे.हा लेख वैचारिक पातळीकडे झुकणाराआहे.

‘बारा बलुतेदार' या लेखातून खेड्याची सांस्कृतिक ओळख असणारी गोष्ट असून बलुतेदारी यावर भाष्य करताना कुणबी आणि बलुतेदार यांच्यातील पारंपरिक संबंधाबद्दल सांगितले आहे. हा लेख बलुतेदारी संपुष्टात येत असल्याच्या काळातील असून या निमित्ताने बलुतेतेदारीची आठवण सांगितली आहे.कुणब्याकडून धान्य स्वरूपात मिळणाऱ्या बैत्यामुळे बलुतेदाराचा चरितार्थ चालायचा. अगदी कुणब्याच्या जीवावर बलुतेदारांची घरे धन धान्याने भरली जायची.बलुतेदाराना कुणब्याकडून मान, हक्क दिला जायचा. आधुनिक काळात बलुतेदारांचे वंशपरंपरेने चालत आलेले पारंपरिक व्यवसाय बंद पडले. बलुतेदारांच्या पुढच्या पिढ्यांना शिक्षण,नोकरी मिळाली.त्यामुळे बलुतेदारीकडे पाठ फिरवल्याचे दिसते. बलुतेदारी संपल्याने ग्राम संस्कृतीच्या खुणा संपुष्टात आल्या असे वाटते. त्यामुळे लेखक विषण्ण होतो.

‘वाटणीची घुसमट' या लेखातून मानवा मानवातील संघर्ष मांडताना हा संघर्ष सत्ता आणि संपत्तीसाठी कसा असतो हे सांगितले आहे. मानव जातीतील वाटणीसाठीचा संघर्ष पुराणापासून चालत आलेला आहे. आधुनिक काळात तर तो अनेकवेळा टोकाचा संघर्ष झालेला पाहायला मिळतो. पण वाटणीत जर संयम ,तडजोड ,समंजसपणा, निस्वार्थी वृत्ती, समाधानी वृत्ती दाखवली तर माणसाचे आयुष्य सुखी होऊ शकते. हा विचार या लेखातून मांडला आहे. रामायण, महाभारत सुद्धा वाटणीसाठी घडले असा संदर्भ लेखकाने दिलेलाआहे.

वाटणीसाठी कोर्ट केस चाललेली असते. कोणत्याही वाटणीत आपल्यावर अन्याय झाला हेच बोलले जाते. वाटणीमध्ये स्वार्थ, अहंभाव, खोटी प्रतिष्ठा, सत्ता, लालसा, हव्यास आणि पराकोटीची ईर्षा या गोष्टी दडलेल्या असतात . अप्पासाहेब खोत यांनी 'वाटणी' या शब्दाची फोड करून वेगवेगळे शब्द तयार करून व त्याचे अर्थ मांडले आहेत.

'गोफणीचे वतन' या ललितलेखातून शेतकरी पिकांच्या संरक्षण करण्यासाठी ज्या साधनाचा वापर करीत असतो. ते गोफण हे साधन मध्यवर्ती ठेवून त्याभोवतीची कथा गुंफली आहे. गोफण हे युद्धातील एक हत्यार सुद्धा आहे. त्या गोफणीच्या बळावर वर्चस्व गाजवून बक्षीस म्हणून गोफण बहाद्दर जमिनीचा अर्धा हिस्सा मिळवतो. दगड अचूक मारणे ही एक कला आहे. त्या कलेच्या जोरावर गोफण बहाद्दर दुसऱ्याची जमीन हडपणाऱ्या व्यक्तीवर दगडांचा मारा करतो. त्याला पळवून लावतो. त्या बदल्यात गोफण बहाद्दरला वतन मिळते. हा गोफण बहाद्दर लेखकाच्या घरातीलच सदस्य असतो. गोफणीमुळे मिळालेले वतन म्हणून त्याला ‘गोफणीचे वतन' हा एक वेगळा शब्दप्रयोग लेखकाने तयार केला.

‘पत्रास कारण की' या लेखातून पत्र लिहिण्याची जुनी परंपरा आणि आधुनिक पत्रव्यवहारची पद्धत यावर भाष्य केले आहे. एकमेकांना पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्रातून ख्यालीखुशाली कळविण्याचा जुना काळ जिवंत केला आहे. माणसांबरोबर गुरे-ढोरे , पिके, पाऊसपाणी यासंबंधीच्या वार्ता पत्रातून समजत होत्या. त्या काळात पत्र लिहिण्याचा आणि पत्र वाचण्याचा तो सोहळा असायचा. एकूणच पत्रव्यवहाराचा बदलता काळ, पत्र, मनीऑर्डरसाठी पोस्टमनची वाट पाहणे, कुरिअरची सेवा, ई-मेल यासंबंधीची मांडणी केली असून हा असा संमिश्र कालखंड या लेखातून लेखकाने मांडला आहे. पूर्वीच्या पत्र लेखनातील भाषा, त्यातला जिव्हाळा, पालहाळिकपणा यावर भाष्य करताना लेखक म्हणतो,‘ अशी मायेन ,प्रेमान ,जिव्हाळयानं ओथंबलेली पत्र आता कोणीच कोणाला पाठवत नाहीत’ . पत्रलेखन थांबल्याने लेखन थांबलं आणि स्वच्छ अक्षरातील शुद्धलेखन थांबलं असे म्हणता येईल .

‘वाटेवरचा प्रवास' या लेखातून वाटा किंवा रस्ते यांची ग्रामीण परिसरातील ओळख करून देताना वाटा या प्रगतीच्या खुणा कशा असतात हे सांगितले आहे. माहेराची वाट, सासरची वाट, पंढरीची वाट, मळयाची वाट अशी संबोधने वापरून माणसाने वाटेला नात्यात गुंतवलेले आहे. वाटेवरून वाक्यप्रचार आणि म्हणींचाही वापर होत असतो. वाट चुकणं हे धोक्यात लक्षण आहे मग ती माणसाची वाट असेल किंवा पशुपक्षांची वाट असेल. शेतवडीतील

वाटांवर अतिक्रमण होऊन पाऊलवाटा, मळवाटा, पाणंदवाटा नामशेष होऊ लागल्या आहेत. गावाचं गावपण कशात आहे हे सांगताना आप्पासाहेब खोत म्हणतात,'गावाला पाणवठा आणि शेताला रानवाटा असाव्यात. आप्पासाहेब खोत यांनी या लेखाच्या माध्यमातून पारंपरिक बाबी सांभाळण्यासंबंधी काही विचार तत्त्वज्ञान मांडले आहे.

'जांभळाचे दिवस' या लेखातून जांभळाच्या हंगामात जांभळाच्या झाडावर चढून जांभळं काढणं, जांभळ खाणं इथपासून ते जांभळाचे गुणधर्म अशी वैविध्यपूर्ण माहिती लेखकाने स्वतःच्या शैलीत मांडली आहे. जांभळ खाण्याचे बालपणातले आणि तरुणपणातले दिवस पासून ते आज वृद्धत्वाकडे झुकताना केवळ औषध म्हणून जांभळाकडे पाहण्याची मानसिकता इथपर्यंतच्या बाबी या निमित्ताने मांडल्या आहेत. .या लेखातही जुना काळ आणि आधुनिक आधुनिक काळ यांचा समन्वय साधलेला आढळतो.

'मळ्यातील घर' या लेखात घर ही गोष्ट कुटुंबाला बांधून टाकणारी वास्तु असते असे सांगताना बदलत्या काळात घर या संस्कृतीवर सुद्धा आघात होऊन त्यातील जिव्हाळा, ओलावा कमी झालेला आढळतो. तरीही मूळ घराशी बांधिलकी जपणारी लेखकाची पिढी आढळते. या लेखातून मळ्यातील घराच्या आठवणी सांगितल्या आहेत. घरासाठी जोतिबाच्या डोंगरावरील वापरलेली दगड, मळ्यातील घरात गेलेले बालपण यासबंधीच्या गोष्टी आल्या आहेत. घराच्या निमित्ताने मळ्यामधील अनेक आठवणी या लेखातून सांगितल्या आहेत. बदलत्या काळात मळ्याच्या घराची पडझड झाली. घराची वाटणी झाली पण आप्पासाहेब खोत यांनी मात्र वाटणीला आलेल्या मळ्यातील घराच्या भिंतींच्या आधारे खोल्या बांधल्या आणि मळ्याच्या घराच्या आठवणी पुन्हा जाग्या केल्या. जुन्या परंपरागत गोष्टींवर विश्वास ठेवणारे जुन्या घराबद्दलची , मळ्याबद्दलची कृतार्थता त्यांच्या या कृतीतून जाणवते.

'देवआंबा' या लेखातून लेखकाच्या मळ्यातील देवआंबा नावाच्या झाडाच्या आठवणी जागा केल्या आहेत. देव आंब्याबद्दलची कृतज्ञता यातून व्यक्त केली आहे. लेखकाच्या आईने त्या आंब्याला देव आंबा हे नाव ठेवले. मूल झाले तर त्या आंब्याचा पहिला मोहर आणि पहिलं फळ देवाला वाहीन असा नवस तिने केला होता .मूल झाल्यावर आजही ती प्रथा सुरू आहे असे लेखक सांगतो. त्या देव आंब्यासंबंधीच्या अनेक आठवणी लेखकाने सांगितल्या आहेत. केवळ त्या शेतकऱ्यालाच त्या कुटुंबापुरता नाही तर पशुपक्षी( पोपट, वानर) यांना आधार देणारा तो देवआंबा असतो. कालांतराने तो देवआंबा तोडला जातो. देव आंब्याबद्दलही कृतार्थता लेखकाने व्यक्त केली आहे.देव आंब्याचे ते झाड जगण्याचे बळ देणारे कसं होतं हे सांगताना देव आंब्याच्या साक्षीनं घडलेल्या अनेक घटना कृतज्ञतापूर्वक सांगितल्या आहेत.

थोडक्यात,'चांदवडी रुपाया' याललित लेखसंग्रहातून आप्पासाहेब खोत यांनी ग्रामीण जीवनाचा पट मांडताना शेती, शेतकरी , सावकार , सावकारी या बाबी संबंधी लिहिले आहे. पारंपरिक गोष्टीबद्दलची कृतार्थता आणि कृतज्ञता, स्त्रियांची वेदना,कौटुंबिक नातेसंबंध, ग्रामीण जीवनाचा कणा असणारी बलुतेदारी, सत्ता आणि वाटणीसाठी निर्माण होणारा संघर्ष या गोष्टीनाही प्राधान्य दिले आहे . जुना काळ आणि आधुनिक काळ यांचा समन्वय साधत ग्रामीण जीवनाचे विश्लेषण लेखकाने केले आहे. या सर्वच लेखातून लेखकांची वैचारिक भूमिका आणि चिंतनशीलता प्रकर्षाने जाणवते.

चांदवाडी रुपाया (ललित लेखसंग्रह)

- आप्पासाहेब खोत

संस्कृती प्रकाशन,पुणे 2024